म. ग्रं. सं. ठाणे
विषय भा. वा
वा. क्र. १९६९५



AS YOU LIKE IT



IRBK-0116645

# अगदीं मनासारखं

दत्तात्रेय केशव भट

श्रीधर प्रकाशन



## शेक्सपियरच्या नाट्यकथा : ?

# अगदीं मनासारखं

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६६७५ नों. दि. १८।८।७८
वि. क्री. वा.

AS YOU LIKE IT ची कथा

दत्तात्रेय केशव भट

श्रीधर प्रकाशन

IRBK-0116645
IRBK-0116645

७.


किंमत ५२ नये पैसे

पहिली आवृत्ति : १९५७

मुद्रक
श्री. बा. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
श्रीधर प्रकाशन
चिराबाजार
मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन



शेक्सपिअरच्या नाट्यकथा

# जेगदीं मनासारखं

"AS YOU LIKE IT" ची कथा

दत्तात्रेय केशव भट

त्या काळीं फ्रान्समध्यें सरंजामी पद्धति होती. लोक स्वतंत्रपणें आपापल्या प्रांताचा कारभार बघत. त्यांपैकीं एकानें कारवाई करून आपल्या वडील भावाला पदच्युत करून त्याला देशोधडीला लावलें व आपण स्वतः त्या प्रांताची सुभेदारी बळकावून बसला.

बिचारा खराखुरा राज्याचा मालक आपल्या कांहीं निवडक विश्वासू अनुयायांसह आर्देनच्या अरण्यांत जाऊन राहिला. जे थोडे लोक त्याच्या बरोबर गेले त्यांना आपल्या स्वतःच्या घरादाराची व जमीनजुमल्याची बिलकुल पर्वा नव्हती. त्यांनीं हा वनवास आपखुषीनें पत्करला होता. आणि येथें त्यांचे दिवस स्वतंत्र वातावरणांत

अगदीं मजेंत जात होते. शहरांतल्या कृत्रिम व विलासी राहाणीपेक्षां त्यांना हा अरण्यवास जास्त आवडत होता. येथें ते इंग्लंडच्या रॉबिनहुडप्रमाणें राहात व मजेंत वेळ घालवीत. राजधानींतली कित्येक तरुण मंडळी येथें येत व स्वतंत्र निष्काळजी जीवनाचा आनंद लुटीत. उन्हाळ्याच्या दिवसांत ते एखाद्या घनराईत मुक्काम ठोकीत. हरिणाची शिकार करणें हा त्यांचा आवडता कार्यक्रम! त्या अरण्यांतले खरेखुरे रहिवासी म्हणजे तीं हरणें! हरणें पळायचीं म्हणजे कोण शोभा! सारें रान पळतें आहे असें वाटायचें! आणि ते प्राणी किती सुरेख! अन्नासाठीं त्यांची हिंसा करणें ह्यांच्या अगदीं जिवावर येई; पण त्याला इलाज नव्हता!

नंतर हिंवाळा सुरू होई. हिंवाळ्यांतला चावरा गार वारा अंगाला झोंबला कीं, ड्यूक थरारून जाई. त्याला आपल्या परिस्थितीची खरी कल्पना येई. तो तें सारें मोठ्या धैर्यानें सहन करीत असे. तो म्हणे, "माझ्या अंगावरून वाहाणाऱ्या ह्या गार वाऱ्यासारखा माझा कुणी खरा सल्लागार नाहीं. त्याच्याजवळ खुशामत नाहीं. हा गार वारा मला माझ्या परिस्थितीची कशी खरीखुरी जाणीव करून देत आहे! आणि त्याचं हें अंगाला झोंबणं जगांतल्या निर्दयपणाच्या व कृतघ्नपणाच्या मानानं कांहींच नाहीं. प्रतिकूल परिस्थितीला कुणी कितीही दोष देवो; पण मला त्यांत माणसाला कितीतरी फायदाच होतो असं वाटतं. उत्तम रत्न हवं असलं तर तें अत्यंत विषारी व भयानक, अशा भुजंगाच्या मस्तकांतूनच काढून घ्यावं लागतं ना!"

अशा तऱ्हेनें आजूबाजूच्या परिस्थितींतून तो ड्यूक आपल्या हिताचा भाग काढून घेऊन स्वतःचें समाधान करून घेत असे. त्याचें आयुष्य म्हणजे एखाद्या तपस्व्याप्रमाणें बनलें होतें. नागर वस्तीपासून खूप दूर! आणि त्याच्या ह्या चिंतनशील स्वभावामुळें



त्याला सर्वत्र निसर्गाचे नैतिक पाठ दिसत होते; वाचतां येत होतें ! त्याच्या दृष्टीला अमंगल व दुःखदायी असें कांहींही दिसत नव्हतें ! उलट, झाडें त्याच्याशीं बोलत; वाहाणाऱ्या निर्झराची कुजबूज त्याला कळे ; त्याला दगडांतून दिव्य संदेश ऐकूं येत. प्रत्येक वस्तुमात्रांत त्याला शाश्वत त्रयीचें दर्शन होई !



ह्या वनवासी ड्यूकला एकुलती एक मुलगी होती. तिचें नांव रोझॅलिंद्. पण तिच्या कपटी काकानें-ड्यूक फ्रेडरिकनें-तिला वडिलांबरोबर जाऊं न देतां, स्वतःच्या मुलीला कोणी मैत्रीण हवी म्हणून, ठेवून घेतलें होतें. त्याच्या मुलीचें नांव सेलिया. दोघां भावांचें अगदीं सात जन्मांचें हाडवर; पण ह्या त्यांच्या मुलींचा मात्र एकमेकींवर अत्यंत जीव होता. त्यांतल्यात्यांत सेलियाला रोझॅलिंद्‌बद्दल फार वाईट वाटे. आपल्या वडिलांनीं केलेल्या ह्या अन्यायाचें आपल्या हातून कांहींतरी परिमार्जन व्हावें म्हणून ती रोझॅलिंद्‌शीं अत्यंत प्रेमानें व कळकळीनें वागे.

जेव्हां रोझॅलिंद्‌ला आपल्या वडिलांची आठवण येई, जेव्हां त्यांच्या हाल-अपेष्टांची ती खंत करीत बसे, जेव्हां तिला स्वतःच्या पराधीन जिण्याची कल्पना येई, तेव्हां ती अगदीं उदास होऊन जाई. आणि मग सेलिया तिच्या मनाला विरंगुळा वाटावा म्हणून आपल्याकडून प्रयत्नांची शिकस्त करी.

एक दिवस रोझॅलिंद् अशीच दुःखीकष्टी होऊन बसली होती. व सेलिया तिची मनधरणी करीत होती, "असं काय करतेस ग ? जरा हास बघूं."

इतक्यांत एक इसम ड्यूकचा निरोप घेऊन आला. "राजवाड्यासमोरील पटांगणांत लवकरच बघण्यासारखं असं द्वंद्वयुद्ध होणार आहे. तुम्हांला बघायला यायचं असलं तर ताबडतोब निघा अशी महाराजांची आज्ञा आहे."

सेलियानें पाहिलें, ह्यानें तरी रोझॅलिंद्‌चें मन रमेल. ती जायला तयार झाली व तिनें तसा निरोपही पाठविला.


त्या काळीं अशीं द्वंद्वें फार होत. राजांच्या दरबारीं सुंदर स्त्रियांसमोर व राजघराण्यांतील स्त्रियांसमोर अशा तऱ्हेचीं द्वंद्वें होणें म्हणजे मोठी करमणूक समजत. आणि म्हणूनच सेलिया रोझॅलिंद् तेथें आल्या होत्या. तेथली

परिस्थिति बघतांच दोघींना वाटलें, ह्या द्वंद्वाचा शेवट चांगला नाहीं व्हायचा. कारण एका बाजूला दरबारांतील एक मल्ल होता. हा कसलेला व अगदीं धिप्पाड असा गडी. त्यानें आतांपर्यंत अनेकांना असल्या द्वंद्व-युद्धांत यमसदनाला पाठवलें होतें. आजचा त्याचा प्रतिस्पर्धी म्हणजे अगदींच कोंवळा असा एक तरुण! त्याच्याकडे बघून प्रत्येकाला वाटे, हा नवखा कोंवळा जीव ह्या दांडगेश्वराच्या हातून हकनाक मरायचा!

फ्रेडरिकचें लक्ष रोझॅलिंद् व सेलियाकडे गेलें. तो म्हणाला, "हं! कसं काय? तुम्ही आलांत हें बघायला? ठीक. पण ह्यांत तुम्हांला गम्मत न वाटतां, वाईट वाटण्याचा संभव आहे. कारण, एकीकडे तो तरुण तर दुसरीकडे हा मल्ल. तुम्ही त्या युवकाला सांगून बघा. तो परावृत्त झाला तर अनायासें भावी अनर्थ टळेल!"

त्या दोघांनाही ही सूचना पसंत पडली. प्रथम सेलियानें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. नंतर रोझॅलिंद् पुढें झाली. तिनें किती कळकळीनें त्याला एकंदर परिस्थितीची जाणीव करून दिली! जीव धोक्यांत घालूं नका, अशी आग्रहाची विनंती केली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या द्वंद्वापासून परावृत्त होण्याऐवजीं त्या युवकाला वाटूं लागलें, 'ही राजकन्या इतक्या प्रेमानें सांगते आहे. डोळ्यांत भरेल असं शौर्य जर आपल्याला दाखवितां आलें, तर किती उत्तम होईल!'

त्यानें सेलिया व रोझॅलिंद् ह्यांच्या विनंतीला इतक्या सौम्य व गोड शब्दांत मुरड घातली कीं, विचारूं नये. तो म्हणाला, "तुमच्यासारख्या स्त्रियांचा शब्द खालीं पडूं देणं माझ्या अगदीं जिवावर आलं आहे. पण मी तर म्हणतों, तुमची प्रेमदृष्टि नि शुभेच्छा मला द्या नि मला लढूं द्याच. मी जिंकलों तर एका निर्दय दांडगेश्वराचा



चांगलाच नक्षा उतरेल! कामाला आलों तर माझ्या मागं माझं कुणी रडायला नाहीं. आणि मी गेल्यामुळं जगाचं कांहींही नुकसान व्हायचं नाहीं. उलट एखाद्या चांगल्या माणसाला इथली जागा रिकामी करून दिल्याचं श्रेय मला लाभेल!"

लवकरच द्वंद्वास सुरुवात झाली. सेलियाला वाटे, ह्या युवकाला कांहीं इजा न व्हावी; आणि रोझॅलिंद्चा जीव तर सारखा खालींवर होत होता. त्या युवकाला कोणीही नाहीं, त्याला आपला जीव सुद्धा नकोसा झाला आहे, – हे विचार जेव्हां तिच्या मनांत येऊन गेले, त्यावेळीं तिला वाटलें, "खरंच, आपलीही अशीच स्थिति नाहीं का?"


जीव मुठींत धरून तो सामना ती बघत होती. कोणी रोझॅलिंद्कडे ह्यावेळीं बघितलें असतें तर त्याला खात्रीनें वाटलें असतें कीं, ह्या मुलीचें त्या तरुणावर प्रेम बसलें आहे.

ह्या अज्ञात युवकाशीं दोघींनीं जें आपुलकीचें वर्तन ठेवलें त्याचा अगदीं इष्ट असा परिणाम झाला. त्याच्या अंगांत खरेंच हजार हत्तींचें बळ संचारलें. त्यानें असे डावपेंच केले कीं, सर्वांनीं तोंडांत बोटें घातलीं! शेवटीं ह्या युवकानें आपल्या प्रतिस्पर्ध्याचा संपूर्ण पराजय केला. त्याला ह्या युवकाच्या हातून इतका मार बसला कीं, बराच वेळ त्याची हालचाल दिसेना किंवा त्याच्या तोंडांतून एकही शब्द फुटेना.

त्या तरुणाचा हा पराक्रम पाहून ड्यूक फ्रेडरिक त्याच्यावर निहायत खूष झाला. त्यानें त्याला आपलें नांव विचारलें. त्याच्या मनांत ह्या शूर गड्याला आपल्या दरबारीं ठेवून घ्यावें अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली. युवकानें सांगितलें, "माझं नांव ऑर्लॅंदो. मी सर रोलंद द बॉइज ह्यांचा सर्वांत धाकटा मुलगा!"

ऑर्लॅंदोचे वडील कांहीं वर्षांपूर्वींच वारले होते. हद्दपार ड्यूकचे – आपल्या भावाचे – ते एक स्नेही होते, हें फ्रेडरिकच्या लक्षांत यावयाला वेळ लागला नाहीं. आणि लगेच त्याच्या मनानें पलट खाल्ली. ह्या तरुणाच्या शौर्यामुळें त्याच्या मनांत उत्पन्न झालेली कौतुकाची भावना एका क्षणांत नाहींशी झाली. ऑर्लॅंदो त्याच्या मनांतून उतरला. तो तेथें फार वेळ न थांबतां कपाळाला आंठ्या घालून निघून गेला. आपल्या भावाबद्दल व त्याच्या मित्रांबद्दल फ्रेडरिकच्या मनांत चांगलीच अढी होती; आणि ऑर्लॅंदोच्या शौर्यामुळें तो त्याला जवळही करूं पाहात होता. म्हणून जातां जातां तो इतकेंच म्हणाला, "तूं दुसऱ्या कुणाचा मुलगा असतास तर फार बरं झालं असतं!"

रोझॅलिंद्ला मात्र मनांतून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आपला प्रियकर आपल्या वडिलांच्या मित्राचा मुलगा हें ऐकून तिला खरेंच आनंद झाला होता. ती



सेलियाकडे वळून म्हणाली, "माझ्या वडिलांचा रोलंद द बॉइजवर खरंच फार लोभ होता. मला हें आधीं कळलं असतं तर, ऑर्लँदो द्वंद्वाला तयार होण्यापूर्वीच मीं रडून रडून आकांत केला असता; नि त्याचं मन वळविलं असतं !"

नंतर ह्या दोघी ऑर्लँदोजवळ गेल्या. तो ड्यूकच्या वर्तनानें खूपच हिरमुसला झालेला दिसला. त्यांनीं त्याला दोन चार समाधानाच्या गोष्टी ऐकविल्या. तेथून निघून जाण्यापूर्वी त्याच्याशीं आणखी कांहीं बोलावें म्हणून रोझॉलिंद् दोनचार पावलें मागें परतली. तिनें आपल्या गळ्यांतली सांखळी काढली व ती म्हणाली, "आपण माझ्यासाठीं ह्या अल्प देणगीचा स्वीकार करावा. मी विचित्र परिस्थितींत आहें. नाहीं तर ह्यापेक्षां चांगलं बक्षीस मीं आपल्याला दिलं असतं."

नंतर बराच वेळ रोझॉलिंद् व सेलिया एकत्र गप्पा मारीत बसल्या होत्या. रोझॉलिंद् त्या तरुणाशिवाय दुसरा विषयच काढीना. सेलियाच्या हें लक्षांत आलें. ती रोझॉलिंदूला म्हणाली, "काय ग ? एकदम त्याच्या इतकी प्रेमपाशांत सांपडलीस कीं काय !" रोझॉलिंद् म्हणाली, "माझ्या वडिलांचा त्यांच्या वडिलांवर फार लोभ होता !"

"म्हणजे त्याच्या मुलावर तूं प्रेम करावंस होय ? मग मी तर ऑरलँदोचा तिरस्कार करायला हवा ! कारण बाबांचं नि त्याच्या वडिलांचं बरं नव्हतं ! पण माझ्या मनांत तर तसं कांहीं आलं नाहीं !"

ऑर्लँदो हा रोलंद द बॉइज्‌चा मुलगा आहे हें कळल्यापासून फ्रेडरिकचें माथें चांगलेंच भडकलें. ड्यूक, त्याच्याबरोबर गेलेले सरदार... सारें सारें त्याला आठवलें. रोझॉलिंद्‌बद्दलही त्याला एकदम तिरस्कार वाटूं लागला. रोझॉलिंद्‌च्या गुणामुळें लोक तिला चांगलें म्हणत तेंही त्याला आठवलें. तो तडक ह्या दोघी बोलत होत्या तेथें आला. आणि संतापानें लाल होऊन म्हणाला, "रोझॉलिंद्! तूं आतांच्या आतां राजवाड्यांतून चालती हो. जिकडे तुझा बाप आहे तिकडे जाऊन तुझं तोंड काळं कर !" नंतर सेलियाकडे वळून तो म्हणाला, "तुझ्यासाठीं मीं हिला ठेवून घेतली होती. आतां काय गरज आहे तिची ?"



" पण बाबा—सेलिआ म्हणाली—मी नव्हतं तुम्हाला म्हटलं कीं, तिला ठेवा म्हणून. मी त्यावेळीं लहान होतें. मला बोलतांसुद्धा येत नव्हतं. आतां मला तिची खरी किंमत कळायला लागली आहे. किती दिवस आम्ही दोघी एकत्र झोपलों आहोंत; एका वेळीं उठलों आहोंत; शिकलों आहोंत; खेळलों आहोंत; एकत्र जेवलों आहोंत. आतां तिच्याशिवाय मला एक क्षणही राहाणं कठीण होणार आहे!"

फ्रेडरिक सेलियाला म्हणाला, " ती तुझ्या-पेक्षां खुप चतुर आहे. तिचा तो शांतपणा, तें चांगलं वागणं आणि धिमेपणा पाहूनच लोकांना तिच्याविषयीं करुणा उत्पन्न होते. पण तूं अगदींच मूर्ख! तूं तिच्याबद्दल तरफदारी करतेस! ती इथून गेली म्हणजे तुझ्या गुणांना मोल येईल. तूं जास्त सुंदर, तल्लख व सद्गुणी अशी लोकदृष्टीला वाटायला लागशील. तिला मी इथून काढून देणार! ह्यांत काडीमात्र फरक होणार नाहीं!"

सेलियानें पाहिलें कीं, आतां वडिलांची मनधरणी करण्यांत अर्थ नाहीं. तिनें रोझॅ-लिंद्बरोबर गृहत्याग करावयाचें ठरविलें. त्या रात्रीं दोघी राजवाड्याबाहेर पडल्या. त्यांनीं आर्देनच्या अरण्याची वाट धरली. तेथेंच रोझॅलिंद्चे वडील व त्यांची मित्र-मंडळी राहात होती.

निघण्यापूर्वी सेलियाच्या मनांत विचार येऊन गेला कीं, आपल्यासारख्या दोन तरुण मुलींनीं असे भारी कपडे घालून एकट्या-दुकट्यानें प्रवास करणें बरें नाहीं. त्यांत धोका आहे. म्हणून त्यांनीं खेडवळ मुलींसारखे पोशाख करण्याचें ठरविलें. त्यावर रोझॅलिंद् म्हणाली, " त्याहीपेक्षां आपणांपैकीं एकीनें जर पुरुषी पोशाख केला तर जास्त चांगलं!"

रोझॅलिंद् सेलियापेक्षां उंच असल्यामुळें तिनें पुरुषाचा वेष घ्यावा, सेलियानें खेडवळ मुलीचे कपडे घालावे, कुणीं विचारपूस केली तर सांगावें—आम्ही बहीणभाऊ आहोंत, असा त्यांनीं बेत केला. त्यांनीं आपलीं नांवें पण बदलून घेतलीं. रोझॅलिंदनें ' गॅनिमीड ' व सेलियानें ' अलिएना ' अशीं नवीं नांवें धारण केलीं.

अशा तऱ्हेनें दोघींनीं वेषांतर केलें. जव-ळचें जडजवाहीर वाटखर्चासाठीं म्हणून नीट बांधून घेतलें. कारण, प्रवास कांहीं जवळचा नव्हता. फ्रेडरिकच्या राज्याच्या सीमान्तावर हें आर्देनचें अरण्य होतें. त्या दोघी राजकन्या राजवाडा सोडून आर्देनच्या वाटेला लागल्या.

वाट चालत असतांना, फारशी वणवणीची संवय नसल्यानें, दोघीही दमल्या होत्या. सेलिया आपल्यासाठीं—आपल्यावरच्या प्रेमामुळें—आपल्याबरोबर आली हें रोझॅलिंद् जाणून होती. त्यामुळें व पुरुषी पोशाख चढविल्यामुळें कीं काय, रोझॅलिंद्च्या अंगांत खरेंच पुरुष संचारला होता! कुणीं पाहिलें तर त्यांना कसलाही संशय आला नसता. कारण गॅनिमीड हा भक्कम व राकट दिसे; उलट अलिएना लाजाळू अशी खेडवळ मुलगी वाटे!

शेवटीं एकदाचीं तीं आर्देनच्या अरण्यांत येऊन पोहोंचलीं. त्यांचा प्रवास एकंदरींत कष्टाचाच झाला. पण वाटेवर निदान कांहीं खाणावळी होत्या. त्यांना तेथें जागाही मिळे. त्यामुळें विसावा घेतां येई! पण आर्देनचें अरण्य लागल्यापासून सारा प्रकार बदलला. तेथें कोठल्या खाणावळी आणि कोठल्या इतर सुखसोयी! खावयाला न मिळाल्यामुळें व विश्रांतीच्या अभावीं गॅनिमीड इतका चिडला

कीं तो अलिएनला म्हणाला, " मला आतां ह्या पुरुषी पोशाखाप्रमाणं वागणं जिवावर आलं आहे. काय हा त्रास! आतां वाटतं एकदा खूप रडून तरी घ्यावं!" अलिएनाला सुद्धा पाऊल उचलवेना. गॅनिमीडनें पाहिलें, ह्या निर्मनुष्य ठिकाणीं असें पडून राहाणें बरें नाहीं. म्हणून पुन्हा पुरुषी थाटांत त्यानें आपल्या बहिणीला धीर देण्याचा प्रयत्न केला, " अलिएना! असं काय करतेस! आतां कांहीं फार दूर जायचं नाहीं. आपण आर्दनच्याच अरण्यांतून चाललों आहोंत."

परंतु हें बळेंबळें आणलेलें धैर्य व पुरुषीपणाचें चालविलेलें नाटक किती वेळ टिकणार! नाहीं नाहीं त्या शंका त्यांच्या मनांत येऊन गेल्या. आपल्याला ड्यूक कुठं आहे हें कसं कळेल? ह्या आर्दन अरण्यांत भटकत तरी किती बसायचं? त्यांना कांहींच सुचेना. तीं दोघें मटकन् खालीं हिरवळीवर बसलीं. त्यांच्यावर मोठा विलक्षण प्रसंग आला होता. जवळपास कुठून मदत मिळण्याचा संभव नाहीं. अन्नपाण्यावांचून आतां इथेंच......

इतक्यांत सुदैवानें त्याः बाजूनें एक खेडवळ माणूस जात होता. गॅनिमीडनें ती संधि वायां जाऊं दिली नाहीं. उरलें सुरलें अवसान अंगांत आणून त्यानें हटकलें, " धनगरबाबा, इथं कुठं आम्हांला विसाव्याला जागा मिळेल का? माझी ही बहीण पोटांत कांहीं नसल्यामुळं व ह्या जंगलांतील प्रवासामुळं अगदीं गळून गेली आहे. आम्ही तुमचे उपकार तसे घेणार नाहीं!"

तो म्हणाला, " मी आहें नोकर माणूस. माझा धनी एक धनगर आहे. त्याच्या घराची लवकरच विक्री होणार आहे. तेव्हां माझ्या मालकाच्या घरांत काय असेल ह्याची तुम्ही कल्पनाच करा! तरी पण जी मदत देतां येण्यासारखी असेल ती मी देईन. चला मजबरोबर."

गॅनिमीड व अलिएना त्या धनगराच्या मागोमाग निघालीं. आतां फारशी काळजी उरली नाहीं म्हणून तीं आपला शीण पार विसरून गेलीं. त्या माणसानें वर्णन केलेली परिस्थिति खरी होती. तो धनगर कर्जबाजारी



झाला होता. ही संधि वाया जाऊं देणें बरें नाहीं, असा ह्या दोघांनीं विचार केला; व त्या धनगराचें खोपटें व त्याच्या मेंढ्यांचा कळप हीं योग्य ती किंमत देऊन त्यानीं खरेदी केलीं. तो मघांचा नोकरही आपल्याकडे ठेवून घेतला !

अशा तऱ्हेनें साऱ्याच गोष्टी मनासारख्या जमून आल्या. राहावयाला घर मिळालें. तें लहान पण स्वच्छ व टुमदार होतें. मेंढ्यांचा कळपही बरा होता. घरांत इतर पुरवठाही होता. तेव्हां गॅनिमीड व अलिएना ह्यांनीं तेथेंच वास्तव्य करावयाचें ठरविलें; व हळूहळू ड्यूक आर्दनच्या अरण्यांत कुठें राहातो ह्या गोष्टीचा तपास करावा, असें मनांत योजलें.

प्रवासाचा शीण हळूहळू ओसरत गेला व दोघांनाही हें धनगराचें जीवन आवडूं लागलें. गॅनिमीड व अलिएना एखाद्या धनगराच्या जोडप्याप्रमाणें राहात होतीं. पण हें नाटक किती दिवस रुचणार ! गॅनिमीडमधली रोझॅलिंड् मधूनच जागी होई. तिला ऑर्लँदोची आठवण येई...तो आपल्यापासून किती दूर! आणि मध्यें पसरलेला हा प्रदेश प्रवास करावयाला कोण कष्टाचा ! तिच्या मनांतली हुरहूर सारखी वाढत जाई ! ऑरलँदो कुठें असेल ?

ऑर्लँदो हा सर रोलंद द बॉइजचा सर्वांत धाकटा मुलगा हें आपण पाहिलेंच. ज्यावेळीं सरसाहेब मृत्युशय्येवर पडले होते त्यावेळीं त्यांनीं आपल्या वडील मुलाला जवळ बोलावून घेतलें व म्हटलें, " ऑलिव्हर, बैस असा. माझा ऑर्लँदो अगदीं लहान आहे. त्याला आपल्या घराण्याच्या नांवलौकिका-प्रमाणें शिक्षण देऊन लहानाचं मोठं करणं तुझ्या हातीं आहे. तूं असं अभिवचन देशील तर माझा जीव सुखानं परलोकच्या यात्रेला जाईल ! "

ऑलिव्हरनें त्यावेळीं कबूल केलें; पण पुढें मात्र तो आपल्या शब्दाला जागला नाहीं. त्यानें ऑर्लँदोच्या बाबतींत सर्वस्वी दुर्लक्ष केलें. त्याला शाळेंतही पाठविलें नाहीं किंवा घरीं त्याच्याकडे कुठल्याही तऱ्हेनें लक्ष दिलें नाहीं. पण ऑर्लँदोच्या रक्तांत त्याच्या वडिलांचा सारा चांगुलपणा उतरला होता. त्याच्या शिक्षणाची व संगोपनाची इतकी हेळसांड होत होती, तरी ऑर्लँदो दहा मुलांत नांव घेण्यासारखा निपजला. त्याला पाहून कोणालाही वाटलें असतें कीं, किती सुंदर वळण आहे ह्या मुलाला !

पण ह्या गोष्टीमुळें ऑलिव्हरचा नुसता जळफळाट होत होता ! ह्याचा काटा कायमचा काढून टाकावा ह्या दुष्ट प्रेरणेनेंच त्यानें ऑर्लँदोला (मागें फ्रेडरिकच्या दरबारांत झालेल्या) द्वंद्वांत भाग घ्यावयाला लावलें ! इच्छा ही कीं, त्या राक्षसी प्रति-स्पर्ध्याच्या हातून ऑर्लँदो चिरडला जावा ! आपल्या वडील भावाच्या ह्या दुष्टपणामुळेंच ऑर्लँदोला जीवन नकोसें झालें होतें !

पण त्या द्वंद्वयुद्धांत साराच प्रकार उलटा झाला. आपला डाव अशा तऱ्हेनें फसला हें पाहून ऑलिव्हरच्या अंतःकर-णांतला मत्सराचा व द्वेषाचा अग्नि चांगलाच भडकला. त्यानें ठरविलें—" ऑर्लँदो निजतो त्या शयनगृहालाच रात्रीं आग लावून द्यावी म्हणजे मग बघूं ! "

ऑलिव्हरचे वरील शब्द वाड्यांतील एका नोकराच्या कानांवर पडले. तो रोलंद द बॉइज् ह्यांच्या तैनातींतील जुना नोकर होता. त्याचा ऑरलँदोवर फार जीव होता. ऑर्लँदो हुबेहूब आपल्या

वडिलांच्या वळणावर गेला होता. ह्यामुळें त्या म्हाताऱ्या चाकराला अगदीं धन्य वाटे. ऑर्लँदोचा जीव वांचविण्यासाठीं तो त्याला एकीकडे गांठून कळवळून म्हणाला, “ छोटे धनी ! तुम्ही इतके चांगले कां निपजलां ! तुमच्या अंगच्या ह्या गुणांमुळें तुमच्या जीवावर येऊन बेतण्याचा प्रसंग आला आहे ! तुमचा शांत स्वभाव, तुमचं शौर्य हीं तुमच्या वडील भावाच्या डोळ्यांत खुपत आहेत. लोक तुम्हांला चांगलं म्हणतात हें त्यांना ऐकवत नाहीं. त्यांनीं त्या फ्रेडरिकच्या दरबारच्या मल्लाकरवीं तुमचा कांटा काढून टाकण्याचाच घाट घातला होता ! आतां त्यांच्या डोक्यांत निराळेंच पिशाच्च थैमान घालीत आहे. आज रात्रीं तुमच्या शयनगृहाला आग लावून तुम्हांला ‘ अग्नये स्वाहा ! ’ करण्याचा त्यांचा बेत आहे ! ” ऑर्लँदो हें ऐकून अगदीं स्तिमित झाला. तो वृद्ध चाकर पुढें म्हणाला “ धनी ! तुम्ही आतां येथून दूर निघून जा. मला माहीत आहे कीं तुमच्याजवळ पैसा नाहीं. मीं त्याची सोय केली आहे. तुमच्या वडिलांच्या चाकरींत ह्या आदामनें जी थोडीबहुत पुंजी जमविली आहे, तिचं आज सार्थक होईल . हे पांचशें क्राउन आहेत. तुम्ही माझी चिंता करूं नका. परमेश्वराला माझी काळजी आहे. तो मला कमी पडूं देणार नाहीं. तुम्ही मलाही आपल्या बरोबर न्या. मी म्हातारा झालों तरी माझीं हाडंपेरं अजून मजबूत आहेत ! ”

आदामची ती स्वामीभक्ति पाहून ऑर्लँदोच्या नेत्रांत आनंदाश्रु आले. तो म्हणाला, “ आदामबाबा, तुम्ही जुन्या काळचीं चाकरमाणसं किती इमानी ! नाहीं तर हल्लींच्या काळांतलीं माणसं बघावीं तर अगदीं अंग-



तुकार नि पोशाखी ! तें असो. आपण दोघे संगातींच जाऊं. आणि आपण इथून थोडेसे दूर गेल्यावर मीच आपल्या दोघांच्या निर्वाहाची कांहीं तरी खटपट करीन ! ”

नंतर आदाम व ऑर्लँदो रात्रीं गुपचूप निघाले. वाट फुटेल तिकडे ते जात होते. कर्मधर्मसंयोगानें ते आर्देनच्याच अरण्यांत आले. आणि गॅनिमीड व अलिएना ह्यांची अन्नपाण्यावांचून जी स्थिति झाली तोच प्रसंग त्या दोघांवरही गुदरला होता ! ते अरण्यांतून भटकत होते. आदामची स्थिति मोठी शोचनीय झाली होती. त्याला एकही पाऊल पुढें टाकवेना. शेवटीं तो म्हणाला, “ छोटे धनी, माझ्या पोटांत आग पेटली आहे. मला आतां चालवत नाहीं. मला पडूं द्या इथंच. आतां मी थोड्या वेळचा सोबती आहें धनी ! ”

ऑर्लँदोनें आदामला ग्लानी आलेली पाहातांच त्याला उचलून घेतलें व झाडांच्या चांगल्या दाट छायेंत त्याला हळूच नेऊन ठेवलें. तो त्याच्या कानांशीं मोठ्यानें म्हणाला, " असेच स्वस्थ इथं पडून राहा. मी जरा इकडून जाऊन येतों. मरणाचा विचार द्या सोडून. स्वस्थ पडून राहा. माझ्यावर विश्वास ठेवा." कांहींतरी खावयाला मिळावें म्हणून शोध करीत ऑरलँदो निघाला. तो अचानक ड्यूक वगैरे मंडळीचा जेथें तळ पडला होता तेथें आला. झाडांच्या दाट छायेंत ड्यूक व त्याच्या सोबतीची इतर मंडळी भोजनाला सुरुवात करावयाच्या बेतांत होती.


ऑर्लँदोनें तें बघितलें. पोटांत कांहीं नसल्यानें तोही भडकून गेला. त्यानें आपली तलवार उपसली. व तो पुढें येऊन म्हणाला, " हं! हात मागें घ्या. ते खाण्याचे सारे पदार्थ माझ्या ताब्यांत द्या!—"

ड्यूक त्याच्याकडे वळून शांतपणें म्हणाला, " भल्या गृहस्था ! तूं हें काय चालवलं आहेस ? तुला भुकेनं ही अशी प्रेरणा दिली आहे, का हा तुझा नुसता आडदांडपणा आहे ? "

ऑर्लँदोनें आपली तरवार म्यान केली व तो म्हणाला, " कित्येक दिवसांपासून माझ्या पोटांत अन्नाचा घास गेलेला नाहीं."

" मग आमच्या पंक्तीलाच या कीं ! " ड्यूकनें त्याला विनंती केली.

ड्यूकचें तें सौजन्याचें वर्तन पाहून ऑर्लँदो अगदीं विरघळून गेला. त्याला आपल्या वर्तनाची शरम वाटली. तो क्षमेच्या स्वरांत म्हणाला, " मला वाटलं, इथं ह्या अरण्यांत सगळंच आयुष्य रानटी असावं ! म्हणून मी तुमच्यासमोर मघां त्या पवित्र्यांत उभा राहिलों. मला क्षमा करा. आपण ह्या भेसूर जंगलांत कां राहातां ? आपण इथं आयुष्याचा काळ कसा घालवतां हेंच नवल आहे ! तुम्हांला ह्यापेक्षां निराळें जीवन माहीत आहे का ? चर्चमधल्या घंटांचे आवाज ज्या परिसरांत घुमतात तिथं तुम्हीं दिवस घालवले असते, कधीं



शहरांतल्या मेजवानीचा चमचमाट बघितला असता, कधीं तुमच्या नेत्रांतून एखादा अश्रुबिंदु नकळत टिपकला असता, तर तुम्हांला कल्पना आली असती कीं दयेनं, माणसाचा किती जीव घेतला जातो! अभिमानी मन म्हणतं, 'नका मारूं मज दया दाखवून!' मला आपल्याला इतकंच म्हणायचं आहे कीं, मला माणुसकीचीच फक्त अपेक्षा आहे!"

त्यावर ड्यूक म्हणाला, "होय; आपण म्हणतां तशींच आम्ही माणसं आहोंत. आम्हीं ह्यापेक्षां चांगले दिवस पाहिलेले आहेत. आम्ही शहरांतून राहिलों आहोंत; घंटानादाबरोबर आमचे पाय प्रार्थना-मंदिराकडे वळले आहेत; आम्हांला मोठ्या मेजवानीचा अनुभव आहे. त्याचप्रमाणें करुणेनें डोळ्यांत उभ्या केलेल्या अश्रूंचीही आम्हांला आठवण आहे! आपण या आणि बसा असे. आपल्याला काय हवं असेल तें नि हवं तितकं घ्या. संकोच करूं नका."

ऑर्लँदो म्हणाला, "मला एकही घास तोंडांत घालतां यायचा नाहीं. माझा एक म्हातारा नोकर पलीकडच्या झाडींत अन्नावांचून तडफडत पडला आहे. त्याच्या तोंडांत कांहीं गेल्याशिवाय मी कांहींही खाणार नाहीं!"

"मग जा तर. त्याला घेऊन या. आम्ही थांबतों तोंपर्यंत!"

ऑर्लँदो एखाद्या हरिणाप्रमाणें पळाला. तिचें पाडस भुकेलें होतें जणूं! त्यानें आदमला पाठीशीं घालून आणलें व तेथें ठेवलें.

ड्यूक म्हणाला, "या!" नंतर त्यांनीं त्या म्हाताऱ्याला थोडें पाणी पाजलें! दोन घास त्याच्या पोटांत जातांच त्याला चांगली हुशारी आली. जेवणें झाल्यानंतर ड्यूकनें ऑर्लँदोची चौकशी केली. आपल्या मित्राचा हा मुलगा आहे हें कळल्यानंतर त्यानें ऑर्लँदोला व आदामला आपल्याच जवळ ठेवून घेतलें.

गॅनिमीड व अलिएना ह्या आर्दनच्या अरण्यांत येऊन त्यांनीं त्या धनगराची जिंदगी विकत घेतली व तीं तेथें राहूं लागलीं. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं ऑर्लँदो व आदाम अशा तऱ्हेनें त्याच अरण्यांत येऊन थडकले होते!

गॅनिमीड व अलिएना मधून मधून अरण्यांत शोध करण्यासाठीं म्हणून जात. त्यांना कांहीं झाडांवर 'रोझॅलिंद्' अशीं अक्षरें खोदलेलीं आढळलीं; व त्याच ठिकाणीं रोझॅलिंद्ला उद्देशून लिहिलेलीं कांहीं प्रेमगीतें पण सांपडलीं. त्यांचा ह्या गोष्टीवर विश्वासच बसेना. पण शेवटीं एक



दिवस प्रत्यक्ष ऑर्लँदोच त्यांच्या समोर उभा राहिला ! रोझॅलिंद्नें दिलेली सांखळी त्याच्या गळ्यांत अद्याप तशीच होती. ऑर्लँदोला कल्पना नव्हती कीं गॅनिमीड म्हणजेच आपली रोझॅलिंद ! जिनें ऑर्लँदोचें अंतःकरण आपल्या गोड वागण्यानें जिंकून घेतलें होतें, तिच्याच प्रेमानें मुग्ध होऊन हा झाडांझाडांवर तिचें नांव कोरून ठेवी. प्रेम-गीतें जुळवीत बसे; व तीं पण कुठें कुठें लावून ठेवी.

गॅनिमीडचें एकंदर सरळ व सौजन्याचें वागणें पाहून ऑर्लँदोनें त्याच्याशीं गप्पा मारायला सुरुवात केली. त्याला मधून मधून गॅनिमीड व रोझॅलिंद् ह्यांचे चेहेरे सारखे वाटत. पण गॅनिमीडचें एकंदर वागणें पुरुषी थाटाचें असल्यानें त्याचा पुन्हा गोंधळ होऊन जाई !



गॅनिमीडनें इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर एका पागल माणसाबद्दल बोलावयाला सुरुवात केली. तो म्हणाला, "इथं, ह्या जंगलांत कुणीतरी पागल राहात असावा. तो कुणाच्या तरी प्रेमानं वेडा झाला आहे. तो आमचीं लहान लहान झाडं अगदीं खराब करून टाकतो. झाडावर 'रोझॅलिंद्' अशीं अक्षरं कोरून ठेवतो. कविता टांगून ठेवतो. कवितांतून सारखी त्या रोझॅलिंद्ची स्तुति करतो. मला तो इसम कुठं आढळला तर मी त्याला चांगली समज देऊन ताळ्यावर आणणार आहें!"

ऑर्लँदो म्हणाला, "मीच तो प्रेमिक. मला काय उपाय सांगायचा तो सांगा; म्हणजे हा त्रास तरी कमी होईल !"

गॅनिमीडनें पुढील उपाय सुचविला. गॅनिमीड म्हणाला, "तुम्हीं रोज इथं यायचं. माझं नांव गॅनिमीड नि ही माझी बहीण अलिएना ! तुम्हीं इथं आलांत म्हणजे मी थोडा वेळ तुमच्या त्या रोझॅलिंद्चं सोंग घेत जाईन. तुम्हीं ज्या तऱ्हेनें रोझॅलिंद्शीं प्रेम-याचना केली असती, तसंच नाटक माझ्या-समोर करायचं. नंतर लहरी स्त्रिया जशा वागतात तसं नाटक करून मी दाखवीन. मग तुम्हांलाच तुमच्या ह्या प्रेमाची शिसारी येईल."

ऑर्लँदोचा ह्या उपायावर विश्वास बसेना. तरी पण त्यानें तेथें रोज यावयाचें कबूल केलें. नंतर रोज ऑर्लँदो गॅनिमीडला रोझॅलिंद् संबोधून आपल्या अंतःकरणांतील एक एक गोष्ट ऐकवी. गॅनिमीड तें ऐकत असे. पण ऑर्लँदोच्या मनांत त्यामुळें कांहीं फरक पडून त्या प्रेमपीडिताला कांहीं गुण येईल, असें दिसेना. ऑर्लँदो हें सारें जाणून होता. पण कांहीं नाहीं तरी आपल्या मनां-तला रोझॅलिंद्विषयींचा प्रेमभाव आपल्याला

बोलून दाखवतां येतो, ह्यामुळें सुद्धा त्याला खूप हलकें वाटूं लागलें. गॅनिमीडला हें सारें खूप आवडत होतें ह्यांत नवल कसलें! ती रोझॅलिंद्च होती आणि तिचीच प्रेमयाचना नकळत ऑर्‌लँदो करीत होता!

असे दिवसांमागून दिवस निघून जात होते. अलिएनानें पाहिलें कीं, गॅनिमिड खुषींत आहे. म्हणून ती कांहीं दिवस एक अवाक्षरही बोलली नाहीं. ऑर्‌लँदोकडून त्यांना ड्यूकचा तपास लागला होता. त्याच्याकडे जाऊन आपल्याला ओळख द्यावयाची आहे ही आठवण सुद्धा अलिएनानें दिली नाहीं. शेवटीं एक दिवस गॅनिमीडची व ड्यूकची गांठ पडली व त्यांची एकमेकांशीं बातचितही थोडीशी झाली. ड्यूकनें गॅनिमीडची हकीगत विचारून घेतली. गॅनिमीडनें सांगितलें, "मी खूप मोठ्या कुळांतला आहें." ड्यूक त्यावर हसला. गॅनिमीडचें एकंदर सौंदर्य बघूनच ड्यूकनें ताडलें कीं, हें राजरक्त आहे. त्यानंतर तें संभाषण तेवढ्यावरच थांबलें.

एक दिवस, सकाळच्या वेळेला, ऑर्‌लँदो गॅनिमीडकडे जात असतां त्याला वाटेंत एक इसम गाढ झोपीं गेलेला आढळला. त्याच्या मानेभोंवतीं एका हिरव्यागार सापानें विळखा घातलेला होता. माणसाची चाहूल लागतांच तो साप तेथून झपाट्यानें सरपटत निघून गेला. ऑर्‌लँदो त्या माणसाच्या जवळ जाऊं लागला, तोंच त्याचें लक्ष पलीकडे गेलें. एक सिंहीण, मांजराप्रमाणें दबा धरून जमिनीवर डोकें टेकून, त्या निजलेल्या माणसाकडे टक लावून पडली होती. ऑर्‌लँदोला माहीत होतें कीं, हीं जंगली जनावरें मोठीं उमदीं असतात. तीं झोपेंत असलेल्या माणसावर हल्ला करीत नाहींत. त्यानें पुढें काय होणार हें जाणलेंच होतें. त्याला वाटलें, 'दैवानें तर ह्या माणसाला वांचविण्यासाठीं आपल्याला इकडल्या बाजूनें यायची बुद्धि दिली नसेल ना'



हा विचार मनांत येतांच ऑर्लँदोनें त्या माणसाकडे जरा निरखून पाहिलें. सर्पाच्या तावडींत सांपडलेला व सिंहिणीच्या भक्ष्य-स्थानीं पडणारा हा दुर्दैवी जीव दुसरा तिसरा कोणी नसून त्याचा वडील भाऊ ऑलिव्हर होता. त्याचबरोबर त्याला ऑलिव्हरचा सारा दुष्टपणा आठवला व क्षणभर वाटलें कीं, 'जाऊं दे. पडूं दे त्याला सिंहिणीच्या जबड्यांत जाऊन. योग्यच प्रायश्चित्त मिळेल त्याला!' पण दुसऱ्या क्षणाला त्याच्या मनाच्या चांगुलपणानें उचल खाल्ली. त्यानें आपली तरवार उपसली व त्या सिंहिणीवर तो धावून गेला. त्यांची खूपच झोंबाझोंबी झाली. त्या पिसाट जनावरानें जोराचा पंजा मारून ऑर्लँदोचा एक हात ओरबाडून काढला. ह्या झटापटींत ऑलिव्हर जागा होऊन पाहातो तों आपला धाकटा भाऊ ऑर्लँदो! आपल्याला वांचवण्यासाठीं ऑरलँदोनें स्वतःचा जीव धोक्यांत घातलेला पाहून ऑलिव्हर लज्जेनें व पश्चात्तापानें अगदीं चूर झाला. तो आर्दनच्या अरण्यांत ऑर्लँदोला ठार करण्याच्याच हेतूनें हिंडत होता. पण ह्या घटनेनें त्याच्या अंतःकरणांत साराच बदल घडून आला. हे दोघे भाऊ प्रथमच एकमेकांना इतके कडकडून भेटले! ऑर्लँदोलाही आनंद झाला. इतका वेळ त्याच्या हाताच्या जखमेकडे कुणाचेंच लक्ष गेलें नव्हतें. जखम मोठी होती व तींतून सारखें रक्त वाहात होतें. ऑरलँदोला चालत जाणें अशक्य होतें. म्हणून तो ऑलिव्हरला म्हणाला, 'इथं जवळच एका धनगराची झोंपडी आहे तिथं तूं जा. गॅनिमीड नांवाचा तरुण तिथं आहे. त्याला ह्या अपघाताची बातमी दे."

त्याप्रमाणें ऑलिव्हर तिकडे गेला. ऑर्लँदोचा आपण कसा छळ केला येथपासून तों शेवटीं ऑर्लँदोनें आपला जीव कसा वांचवला येथपर्यंत सारी हकीगत त्यानें अगदीं प्रामाणिकपणें सांगितली. नंतर तो म्हणाला, "आम्हीं आतां खरंच भाऊ भाऊ म्हणून प्रेमानं राहाणार आहोंत. मीं दुष्टपणानं नि मत्सरानं त्याचा छळ केला ही मोठी वाईट गोष्ट झाली!"

ऑलिव्हरचें मनमोकळें बोलणें अलिएनाला फार आवडलें व तिचें मन त्याच्यावर बसलें. ऑलिव्हर हकीगत सांगत असतां अलिएना अगदीं लक्ष लावून ऐकत होती. तिच्या हळुवार अंतःकरणांत तेवढ्यानेंही गहिंवरून आलें. ऑलिव्हर हें बघतच होता. त्याच्याही मनांत तिच्याविषयीं खूप आपुलकी उत्पन्न झाली.

इकडे ह्या दोघांच्या अंतःकरणांत प्रेमानें गोड चुळबूळ सुरू केली, तर तिकडे गॅनिमीड ही बातमी ऐकून बेशुद्ध पडला. त्याचेंही कारण प्रेमच! तो शुद्धीवर आल्या-नंतर त्याच्या लक्षांत आलें कीं, झालें हें बरें झालें नाहीं! त्याप्रमाणें त्यानें बतावणी केली, "मीं हें सारं नाटक केलं बरं का! तिकडे जाल तेव्हां आपल्या बंधूंना सांगा, मी किती उत्तम नट आहे तें!"

ऑलिव्हरनें त्या तरुणाचा तो भेदरलेला चेहेरा पाहून ओळखलें कीं, त्याला खरेंच मूर्च्छा आली होती. त्याला त्याच्या दुबळ्या अंतःकरणाची कींव आली. तो त्याला धीर देण्याच्या उद्देशानें म्हणाला, "तरुण माणसा! हरकत नाहीं. आतां जरा एखाद्या बेडर माणसासारखा वाग बघूं!" "तसा प्रयत्न मी करतोंच आहें. पण जन्मानं मी स्त्री असतों तर बरंच झालं असतं!"



ऑलिव्हर बरेच दिवस तेथें राहिला. नंतर तो जेव्हां ऑर्लँदोकडे गेला तेव्हां त्याला कितीतरी गोष्टी आपल्या भावाशीं मनमोकळेपणानें बोलावयाच्या होत्या !

ती बातमी ऐकून गॅनिमीडला कशी मूर्च्छा आली तें त्यानें सांगितलें. नंतर स्वतःच्या प्रेमाची हकीगत सांगितली. तो म्हणाला, " मी ही गोष्ट अलिएनाच्या भावाशीं पण बोललों. गॅनिमीडची ह्या विवाहाला संमति आहे. त्याचं त्याच्या बहिणीवर फार प्रेम आहे. तो इतकंही म्हणाला कीं, हें लग्न झाल्यावर मी इथंच धनगर म्हणून राहीन; आणि मग हें घरदार ऑर्लँदोला देऊन टाकीन ! "

ऑर्लँदो म्हणाला, " माझीही ह्या गोष्टीला संमति आहे. तूं हें लग्न उद्यां ठरवलंस तरी हरकत नाहीं. मी ड्यूक वगैरे मंडळींना निमंत्रण देऊन येतों. तूं आतां अलिएनाकडे जा नि तिची संमति घेऊन ये. ती घरीं एकटीच आहे. हा पाहा तिचा भाऊ गॅनिमीड इकडून येतो आहे. जा लवकर ! "

गॅनिमीडनें प्रथम ऑर्लँदोची जखम पाहिली. नंतर त्यांच्या ऑलिव्हर व अलिएना ह्यांच्या प्रेमाबद्दल व लग्नाबद्दल गोष्टी निघाल्या. ऑर्लँदो म्हणाला, " मी आतांच ऑलिव्हरला अलिएनाकडे पाठवलं आहे. तिच्या संमतीनं उद्यांचा दिवस नक्की ठरवून लग्न उरकून घ्या, असाही मीं सल्ला दिला आहे ! मात्र माझ्या मनांत राहून राहून एक गोष्ट येते कीं, उद्यां ह्याच लग्नाबरोबर माझा अन् रोझॅलिंद्चा विवाह झाला तर किती आनंद होईल ! "

त्यावर गॅनिमीड म्हणाला, " हा विचार कांहीं वाईट नाहीं. तुमचं रोझॅलिंद्वर खरंच अंतःकरणापासून प्रेम असलं तर मी प्रयत्न करून बघतों. तुम्ही सांगा नुसतं. मी उद्यां रोझॅलिंद्ला तुमच्यासमोर उभी करतों. इतकंच नाहीं, पण तुमच्याशीं तिला विवाहबद्ध व्हायला भाग पाडतों ! ! "

" हें कसं शक्य आहे ? " ऑर्लँदोनें पृच्छा केली.

" मला एक गुप्तविद्या येते आहे. मी ही विद्या माझ्या चुलत्याजवळून शिकलों आहें. त्यामुळें मला ही गोष्ट म्हणजे फारशी कठीण वाटत नाहीं. " गॅनिमीडनें ठोकून दिलें.

" माझा अजून विश्वास बसत नाहीं. " ऑर्लँदो म्हणाला.

"मी शपथेवर सांगतों. विश्वास ठेवा माझ्या बोलण्यावर. तुमचं रोझॅलिंद्वर खरंच प्रेम असलं तर तुम्ही खात्री ठेवा. तुमचंही लग्न उद्यांच होईल ! तेव्हां, तुम्ही आतां जा; चांगले कपडे करा; आणि ड्यूकसाहेबांना व तुमच्या इतर स्नेह्यांना तुमच्या व ऑलिव्हरच्या अशा दोन्ही लग्नांचीं निमंत्रणं देऊन या ! रोझॅलिंद्ला इथं उपस्थित ठेवण्याचं काम माझं. " गॅनिमीड म्हणाला.

ऑलिव्हरनें अलिएनाची संमति मिळविली आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं ऑर्लँदो व ऑलिव्हर हे दोघे ड्यूककडे गेले. त्यांनीं सर्व हकीगत सांगितली व सर्व मंडळीला लग्नाचें रीतसर निमंत्रण पण दिलें.

सर्व मंडळी जमली. दोन लग्नें लागावयाचीं होतीं. पण अजून एका नवरीचा पत्ता नव्हता!

सर्वांना वाटलें कीं, गॅनिमीडची ही नुसती बनवाबनवी असावी!

नंतर ड्यूकनें चौकशी केली कीं, ती मुलगी तरी कोण, तेव्हां त्याला कळलें कीं, ती आपलीच मुलगी रोझलिंद्!

त्यानें ऑर्लँदोला विचारलें, "खरंच, गॅनिमीड रोझॅलिंद्ला घेऊन येणार आहे का?" ऑर्लँदोला कांहीं उत्तरच देतां येईना. इतक्यांत गॅनिमीड स्वतः तेथें उपस्थित झाला, व त्यानें ड्यूकला विचारलें,

"आपण रोझॅलिंद्ला घेऊन आलांत का? दिसत नाहीं तसं! मी जर तिला येथें हजर केली तर आपण तिला ऑर्लँदोशीं विवाहबद्ध होण्याची परवानगी द्याल का?"

"मोठ्या आनंदानं!" ड्यूक ओरडला. "माझ्याजवळ कांहीं नाहीं. नाहीं तर मी रोझॅलिंद्बरोबर सारं राज्य देऊन टाकलं असतं!"

नंतर गॅनिमीड ऑर्लँदोकडे वळून म्हणाला, "मग काय आपली रोझॅलिंद्शीं लग्न करण्याची तयारी आहे ना?" "होय." ऑर्लँदो आनंदानें म्हणाला, "मी मोठा सार्वभौम राजा असतों तरी तिच्याशींच लग्न केलं असतं."

नंतर गॅनिमीड व अलिएना, दोघें आंत गेलीं. गॅनिमीडनें आपला पुरुषी वेश काढून टाकला. कुठल्याही मंत्रतंत्राशिवाय गॅनिमीडचें रूपांतर रोझॅलिंदमध्यें झालें! अलिएनानें फक्त आपले पूर्वीचे कपडे घातले. आतां तिला अलिएना म्हणून कुणीं ओळखली नसती. ती सेलियाच आहे अशीच त्यांची खात्री पटली असती.

त्या गेल्यानंतर ड्यूकनें ऑर्लँदोजवळ बोलून दाखविलें, "मला ह्या गॅनिमीडमध्यें व रोझॅलिंद्मध्यें फार साम्य वाटतं."

"मलाही असंच मधून मधून वाटे." ऑर्लँदो म्हणाला, "पण खात्री पटेना!"

सारेजण आश्चर्यानें समोर पाहूं लागले! रोझॅलिंद् व सेलिया समोरून येत होत्या. आतां नाटक करण्याची जरूर नव्हती. रोझॅलिंद् धावतच आपल्या वडिलांकडे गेली व तिनें त्याच्या पायाशीं लोळण घेतली. तिनें सारी हकीगत सांगितली—आपण व सेलिया बहिण-भाऊ म्हणून येथें कसे राहात होतों, नंतर अशा अशा गोष्टी जुळत जुळत आज सारा आनंदीआनंद कसा झाला आहे, वगैरे, वगैरे तिनें वर्णन करून सांगितलें.

ड्यूकला ही सारी विधिघटना आश्चर्यकारक वाटली. सगळ्यांच्या अगदीं मनासारखें कसें घडत आलें! हाही चमत्कारच नाहीं का! त्यानें त्या मंगल विवाहाला तत्काल संमति दिली. दोन्ही समारंभ आनंदानें पार पडले. त्या आर्देनच्या अरण्याला आज प्रथमच वासंतिक बहर आला! हींच लग्नें शहरांत झालीं असतीं तर त्या समारंभाला कांहीं निराळेंच स्वरूप आलें असतें! येथें तो डामडौल, झकपक, देखावा नव्हता! येथें खरीं माणसें

प्रेमानें हा आनंदाचा सोहळा साजरा करीत होतीं ! चांगलें व्हावयाला लागलें कीं, सगळेंच चांगलें होतें ! मंडळी झाडांच्या दाट छायेंत खाण्यापिण्याचा कार्यक्रम आनंदानें उरकीत होती, इतक्यांत एक दूत तेथें आला व ड्यूकला नम्रपणें अभिवादन करून म्हणाला,

"महाराज, मी फ्रेडरिकमहाराजांकडून आलों आहें. इतक्या दिवसांत आमच्याकडे घडलेल्या बऱ्याच घटना प्रथम सांगतों. सेलिया राजवाड्यांतून नाहींशी झाली तेव्हांपासून महाराजांचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. त्यांत आणखी इतर बातम्यांची भर पडली. बरींचशीं सज्जन माणसं राज्यांत राहायला कंटाळून आर्देनच्या अरण्यांत जाऊं लागलीं आहेत, हें ऐकून महाराज अगदीं बेचैन झाले. तुमच्याकडे लोक जातात ही गोष्ट त्यांना फार जाणवली. त्यांच्या उरांत सैतानानें घर केलं. त्यांनीं बरंच सैन्य जमवलं व आर्देनच्या अरण्याची वाट धरली. तुम्हां साऱ्या लोकांना ह्या जगांतून कायमचं नाहींसं करून टाकण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली होती. पण व्हायचं होतं निराळंच कांहीं ! अरण्यांत ते शिरले, तिथ त्यांना एक साधु आढळला. फ्रेडरिक महाराजांचें व त्याचें खूप वेळ संभाषण चालू होतें. आणि आश्चर्य असं कीं, तेव्हांपासून महाराजांमध्यें विलक्षण बदल घडून आला आहे. तेव्हांपासून त्यांनीं ठरवलं आहे कीं, आतां राज्य नको; कांहीं नको ! असंच देवाचं नांव घेत बसावं. त्यांना कृतकर्माचा इतका पश्चात्ताप झाला आहे कीं, प्रथम तें राज्य आपल्या हवालीं केल्याशिवाय त्यांना स्वस्थता मिळायची नाहीं ! त्यांनींच मला आपला शोध करून आपल्याला हें सारं कळविण्याची आज्ञा दिली. आज तो सुदिन उगवला !"

ही आनंदाची वार्ता ऐकून साऱ्यांनाच स्वर्ग ठेंगणा वाटूं लागला ! सेलियाच्या दृष्टीनें ही बातमी म्हणजे तिचा राज्याचा वारसा नाहींसा होणें व तें भाग्य रोझॅलिंड्ला मिळणें ! तरी तिला त्याचें कांहीं वाटलें नाहीं. रोझॅलिंड्वर तिचें अकृत्रिम प्रेम होतेंच !

ड्यूकच्या आयुष्यांतला हा मोठा भाग्याचा दिवस होता ! सगळ्यांच्या अगदीं मनासारखें सारें घडून आलें ! ड्यूकच्या सहवासांत ज्यांनीं वनवास पत्करला होता त्यांना स्वराज्यांत परत आनंदानें पूर्वीपेक्षां जास्त सुखासमाधानांत राहावयाला मिळालें ! ज्यांच्या अंतःकरणांत पूर्वी हालाहल भरलेले होतें, त्यांच्या अंतःकरणांत अमृताचा झरा वाहूं लागला ! तरुणांच्या प्रणयी अंतःकरणांतून प्रेमपूर्तीचे – समाधानाचे निनाद निघत,

"अगदीं मनासारखं, सारं अगदीं मनासारखं झालं !"

IRBK-0116645

IRBK-0116645

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९६६७५ नों. दि. १५/८/७६
वि. वा.वा